# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचेकार्यालय

रामनगरसृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे

दुरध्वनीक्र. ०२२-२९४५१००१

E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेस नोट क्रमांक :- १३१/२०२५ दिनांक :- २०/०३/२०२५.

## गुंगीकारक औषध देवुन चोरी करणारा सराईत आरोपी पकडण्यात गुन्हे शाखा, कक्ष- १ काशिमीरा यांना यश.

**हकिगत** :- दिनांक १४/०३/२०२५ रोजी रात्री १२.३० वाजेच्या सुमारास अव्हेन्यु लॉजिंग, एम.टी.एन.एल. रोड शांती पार्क मिरारोड पुर्व, येथे फिर्यादी यांना, अविनाश (पुर्ण नाव व पत्ता माहिती नाही) यांने गुंगीकारक औषध देवुन फिर्यादी यांना बेशुध्द करुन त्यांचे गळयातील चैन, दोन अंगठया व रोख रक्कम असा ८१,०००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल चोरी करुन नेला म्हणुन मिरारोड पोलीस ठाणे गुन्हा रजि नंबर १७१/२०२५ बि.एन.एस. २०२३ कलम १२३,३०५ प्रमाणे गुन्हा नोंद आहे.

**गुन्ह्याची ऊकल** : सदर गुन्हे अनुषंगाने मा. वरिष्ठांनी दिलेल्या सुचनेनुसार गुन्हयाचा समांतर तपास गुन्हे शाखा कक्ष - १ काशिमीराव्दारे सुरु करण्यात आला. तांत्रिक विश्लेषण व गोपनीय बातमीवरुन आरोपीत नामे अविनाश ऊर्फ अभिषेक सत्यनारायण अग्रवाल वय- ३८ वर्षे, रा. चंद्रेश रेसिडेंन्सी जवळ, राहुल पार्क, भाईंदर पुर्व, ता.जि. ठाणे यास शिताफीने ताब्यात घेण्यात आले असुन त्याचेकडे सदर गुन्ह्याचे अनुषंगाने विचारपुस केली असता त्याचा सदर गुन्ह्यात सहभाग असल्याचे निष्पन्न झाले आहे.

आरोपीत नामे- अविनाश ऊर्फ अभिषेक सत्यनारायण अग्रवाल याचा गुन्हेगारी पुर्वाभिलेख पडताळुन पाहता त्याचेवर खालील प्रमाणे गुन्हे नोंद आहेत.

| अ.क्र. | पोलीस ठाणे | गुन्हा रजि.नं व कलम |
|---|---|---|
| १ | दहिसर पोलीस ठाणे (मुंबई शहर) | ९६/२०१९ भा.द.वी.सं. कलम ३८० सदर गुन्हयात आरोपीत यास शिक्षा झालेली आहे. |
| २ | नवघर पोलीस ठाणे | १२५६/२०१९ भा.द.वी.सं. कलम ४१७, ४२० प्रमाणे |
| ३ | भाईंदर पोलीस ठाणे | ३०१/२०२१ भा.द.वी.सं. कलम ३२८, ३७९ प्रमाणे |
| ४ | मिरारोड पोलीस ठाणे | ४६/२०२१ भा.द.वी.सं. कलम ४५७, ३८० प्रमाणे |

उक्त आरोपी यास पुढील कारवाई करीता मिरारोड पोलीस ठाणे येथे हजर करण्यात आले असुन गुन्हयाचा अधिक तपास सुरु आहे.

सदरची कामगिरी मा.श्री. मधुकर पाण्डेय, पोलीस आयुक्त सो, मा.श्री. दत्तात्रय शिंदे, अपर पोलीस आयुक्त सो, मा. श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त सो., गुन्हे, मा. श्री. मदन बल्लाळ, सहा. पोलीस आयुक्त सो., गुन्हे शाखा यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा कक्ष-१, काशिमीरा येथील पोनि. प्रमोद बडाख, पोउपनिरी / उमेश भागवत, पोउपनि./संदीप शिंदे, सफौ/ अशोक पाटील, अविनाश गर्जे, पुष्पेंद्र थापा, संतोष लांडगे, पो.हवा/ मनोज चव्हाण, सचिन हुले, अश्विन पाटील पो.शि/प्रशांत विसपुते, गौरव बारी, सौरभ इंगळे, धिरज मेंगाणे म.सु.ब./सचिन चौधरी तसेच स.फौज. संतोष चव्हाण सायबर गुन्हे शाखा यांनी केली.

